# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका

## बांधकाम विभाग

**विषय – सिमेंट कॉंक्रिट रोड तयार करणे या लेखाशिर्षामध्ये पुर्नविनियोजन करणेकामी अर्थसंकल्पीय तरतूदीचे प्रशासकीय ठराव करुन घेणेबाबत.**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ६३,६६,६७ (क),९०,३१९ कलम अन्वये जनतेच्या सेवेसाठी किंवा सुरक्षिततेसाठी भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी विकास कामे करण्यासाठी आर्थिक तरतूद करणे हे मा.आयुक्त सा ो. यांचे अधिकार आहेत. त्याप्रमाणे या अधिनियमाच्या कलम ९५ व ९६ प्रमाणे दरवर्षी उत्पन्न व खर्च करण्यासाठी लेखाशिर्ष निहाय तसेच बाब निहाय आर्थिक तरतूद करण्यात आली होती. या तरतूदी मधून आतापर्यंत खर्च झाल्याचा तपशिल खालील प्रमाणे

| अ.क्र. | लेखाशिर्षकाचे नाव | सन २०२३-२४ करीता करणेत आलेली तरतूद | दि.२४/११/२०२३ पर्यत नोंदविलेली तरतूद रककम | दि. २४/११/२०२३ पर्यंतची शिल्लक | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | सिमेंट कॉंक्रिट रोड तयार करणे | रु. ५०.०० लक्ष | रु.४०.३७ लक्ष | ९.६३ लक्ष | |
| | एकूण | रु. ५०.०० लक्ष | रु.४०.३७ लक्ष | ९.६३ लक्ष | |

सन २०२३-२०२४ या वित्तीय वर्षाचा जो अर्थसंकल्प मंजूर झाला आहे, त्यातील सिमेंट कॉंक्रिट रोड तयार करणे या लेखाशिर्षामध्ये निधी कमी प्रमाण शिल्लक आहे. मात्र खालील विषयांकित काम करणे आवश्यक आहे. प्रभाग समिती क्रमांक ३ च्या कार्यक्षेत्रामध्ये ६०० मी.मी व्यासाची जलवाहीनी अंथरणेकामी एकूण १.५० कि.मी लांबीचा डांबरी रस्ता स्टेम वॉटर डिस्ट्री. ॲण्ड इन्फ्रा.कं.प्रा.लि यांनी खोदलेला आहे. सदर केलेल्या कामाचे रस्ते खोदाई शुल्क रु.१.४४ कोटी कंपनीने मनपास अदा न करता फिरती बाब म्हणून रोड रेस्टोरेशन चार्जेस मधून मनपास वळते करुन घेणे बाबत no/stem/ab/१८२७ दि.२१/०७/२०२३ नुसार कळविले आहे. त्यानुसार मा.प्रशासक तथा आयुक्त सा ो. यांनी रककम वळती करुन समायोजन करणेबाबत दि.६/९/२०२३ रोजी मान्यता दिलेली आहे. सदरची रक्कम ही "मुंबई मनपा व स्टेम पाणीपुरवठा योजना पाणी खरेदी व थकबाकी" हया पाणीपुरवठा विभागाकडील लेखाशिर्षात समायोजन केलेली आहे. मात्र पाणीपुरवठा विभागाकडे निधीची कमतरता असल्यामुळे त्यांनी बांधकाम विभागाने इतर लेखामधुन पुर्नविनियोजन करुन निधी उपलब्ध करणेबाबत कळविले आहे. विषयांकित कामाची निकड पहाता सी.सी रस्ता तयार करणे गरजेचे आहे. मात्र निधी नसल्यामुळे "सिमेंट कॉंक्रिट रोड तयार करणे" या लेखाशिर्षामध्ये पुर्नविनियोजन करावे लागणार आहे. तरी विषयांकित कामाचे अंदाजपत्रक रु. १४३.८६/- लक्ष रक्कमेचे असल्यामुळे "नविन कर्मचारी निवासस्थान बांधणे" व "व-हाळतलाव परिसर संवर्धन व सुशोभिकरण" या लेखाशिर्षामधून रु. १.४४ कोटी लक्ष रुपयाचे पुर्नविनियोजन करावयाचे आहे.

| कामाचे नाव | रक्कम | शेरा |
|---|---|---|
| विषय- वार्ड क्र.२१ मधील व-हाळदेवी मंगल भवन कार्यालय समोरील गुजराती वडापाव शेजारील रस्त्यापासून ते मनपा शाळा क्र.३३ पर्यत सी.सी.रस्ता तयार करणे. | रु. १४३.८६/- लक्ष | |
| एकूण | रु. १४३.८६/- लक्ष | |

खालील लेखाशिर्षामधून पुनर्विनियोजन करावयाचे आहे.

| अ. क्र. | लेखाशिर्षाचे नाव | सन २०२३-२४ करीता करणेत आलेली तरतूद | दि.२३/११/२०२३ पर्यत नोंदविलेली तरतूद रक्कम पुनर्विनियोजनाच्या रककमेसह (खर्च) | दि. २३/११/२०२३ पर्यंतची तरतूद शिल्लक रक्कम | पुनर्विनियोजना करीता घ्यावयाची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | नविन कर्मचारी निवासस्थान बांधणे | रु.३००.०० लक्ष | रु.१७८.८३ लक्ष | रु.१२१.१७ लक्ष | रु.१००.०० लक्ष |
| २ | व-हाळतलाव परिसर संवर्धन व सुशोभिकरण | रु.५०.०० लक्ष | रु.०.०० लक्ष | रु.५०.०० लक्ष | रु.३५.०० लक्ष |
| | एकूण | रु.३५०.०० लक्ष | रु.१७८.८३ लक्ष | रु.१७१.१७ लक्ष | रु.१३५.०० लक्ष |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १०२,कलम १०३ व कलम १०४ अन्वये एखादया लेखाशिर्षाखाली रक्कम खर्च झाली नाही व त्यात बचत झाली तर या नियमाच्या आधारे अनुदानाच्या तुलनेत जादा होणारा खर्च बचतीच्या रक्कमांचा उपयोग करून भागवीता येवू शकतो व असे पुनर्विनियोजन करण्याचे अधिकार मा.आयुक्त सा़ो. यांचे मान्यतेने मा.स्थायी समितीस सादर करणे आवश्यक आहे. मात्र सध्या स्थायी समितीचे अधिकार मा.प्रशासक तथा आयुक्त सा़ो. यांच्याकडे निहीत आहेत.

वार्ड क्र.२१ मधील व-हाळदेवी मंगल भवन कार्यालय समोरील गुजराती वडापाव शेजारील रस्त्यापासून ते मनपा शाळा क्र.३३ पर्यत सी.सी.रस्ता तयार करणे. विषयांकित कामाकरीता निधीचे पुनर्विनियोजन करणेकामी कनिष्ठ अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे. त्या अनुषंगाने सिमेंट कॉंक्रिट रोड तयार करणे या लेखाशिर्षामध्ये "नविन कर्मचारी निवासस्थान बांधणे" व "व-हाळतलाव परिसर संवर्धन व सुशोभिकरण" या लेखाशिर्षामधून एकूण रु.१ कोटी ३५ लक्ष रुपयाचे पुनर्विनियोजन करणे आवश्यक असून त्याचा स्वतंत्र नमूना क्र.१० नियम ३० (३) प्रस्ताव तयार केला आहे. त्यास मा.प्रशासक तथा आयुक्त सा़ो. यांनी दिनांक 24 / 11 /२०२३ रोजी मान्यता दिलेली आहे. तरी यासाठीचा प्रशासकीय ठराव मंजुर करुन घ्यावा ही विनंती.

**ठराव क्र.** २९३

**दिनांक** 28/11 /२०२३

वार्ड क्र.२१ मधील व-हाळदेवी मंगल भवन कार्यालय समोरील गुजराती वडापाव शेजारील रस्त्यापासून ते मनपा शाळा क्र.३३ पर्यत सी.सी.रस्ता तयार करणे. विषयांकित कामाची निकड पहाता सी.सी.रस्ता बनविणे गरजेचे असल्यामूळे सिमेंट कॉंक्रिट रोड तयार करणे या लेखाशिर्षामध्ये तरतुद (निधी) कमी असल्यामुळे "नविन कर्मचारी निवासस्थान बांधणे" व "व-हाळतलाव परिसर संवर्धन व सुशोभिकरण" या लेखाशिर्षामधून एकूण रु.१ कोटी ३५ लक्ष रुपयाचे पुनर्वियोजनाने निधी वर्ग करणेस महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४ दि.६ जुन २०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी श्री.अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त उपरोक्त शिफारस केल्याप्रमाणे मान्यता देत आहे.

(अजय वैद्य)
**प्रशासक तथा आयुक्त**

नमुना क्र.१०

नियम ३० (३) पहा

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी

| या लेखाशिर्षातुन | | | | | | या लेखाशिर्षाकरिता | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | प्रधान,गौण व तपशिलवार माहिती | बांधकाम विषयक सेवा व इतर | मुळ अनुदान पर्यत खर्च | आज तारखे पर्यत खर्च | उपलब्ध शिल्लक | प्रधान,गौण व तपशिलवार माहिती | बांधकाम विषयक सेवा व इतर | मुळ अनुदान पर्यत खर्च | आज तारखे पर्यत खर्च | प्रस्तावित वाढीची रक्कम खर्च | अभिप्राय |
| १ | भांडवली खर्च भाग-४ | अ-२/३ नविन कर्मचारी निवासस्थान बांधणे | सन २०२३-२४ करीता रु.३००.०० लक्ष | सन २०२३-२४ करीता रु.१७८.८३ लक्ष | सन २०२३-२४ करीता रु.१२१.१७ लक्ष | भांडवली खर्च भाग-४ | सिमेंट कॉंक्रिट रोड तयार करणे | सन २०२३-२४ करीता रु.५०.०० लक्ष | सन २०२३-२४ करीता रु. ४०.३७ लक्ष | रु.१००.०० लक्ष | प्रभाग समिती क्र.३ अंतर्गत सी.सी .रस्ता नविन बनविणेकामी रु.१ कोटी ३५ लक्ष रुपयाचे सिमेंट कॉंक्रिट रोड तयार करणे या लेखाशिर्षामध्ये पुर्नविनियोजनाने प्रस्तावित करण्यात येत आहेत. |
| २ | भांडवली खर्च भाग-४ | ब-१/१ व-हाळतलाव परिसर संवर्धन व सुशोभिकरण | सन २०२३-२४ करीता रु.५०.०० लक्ष | सन २०२३-२४ करीता रु.०.०० लक्ष | सन २०२३-२४ करीता रु.५०.०० लक्ष | भांडवली खर्च भाग-४ | सिमेंट कॉंक्रिट रोड तयार करणे | सन २०२३-२४ करीता रु.५०.०० लक्ष | सन २०२३-२४ करीता रु. ४०.३७ लक्ष | रु.३५.०० लक्ष | |
| | | एकूण | | | | | | | | रु.१३५.०० लक्ष | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| शहर अभियंता<br>भिवंडी नि.शहर मनपा | मुख्य लेखा परिक्षक<br>भिवंडी नि.शहर मनपा | मुख्य लेखा व वित्त अधिकारी<br>भिवंडी नि.शहर मनपा | अति. आयुक्त<br>भिवंडी नि.शहर मनपा | प्रशासक तथा आयुक्त<br>भिवंडी नि.शहर मनपा |

# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका
## बांधकाम विभाग

**विषय – नाले गटार मो-या बांधणे या लेखाशिर्षामध्ये पुनर्विनियोजन करणेकामी अर्थसंकल्पीय तरतूदीचे प्रशासकीय ठराव करुन घेणेबाबत.**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ६३,६६,६७ (क),९०,३१९ कलम अन्वये जनतेच्या सेवेसाठी किंवा सुरक्षिततेसाठी मा.स्थायी समितीच्या मान्यतेने भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी विकास कामे करण्यासाठी आर्थिक तरतूद करणे हे मा.आयुक्त सा.ो. यांचे अधिकार आहेत. त्याप्रमाणे या अधिनियमाच्या कलम ९५ व ९६ प्रमाणे दरवर्षी उत्पन्न व खर्च करण्यासाठी लेखाशिर्ष निहाय तसेच बाब निहाय आर्थिक तरतूद करण्यात आली होती. या तरतूदी मधून आतापर्यंत खर्च झाल्याचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.क्र. | लेखाशिर्षकाचे नाव | सन २०२३-२४ करीता करणेत आलेली तरतूद | दि.०९/११/२०२३ पर्यत नोंदविलेली तरतूद रककम | दि. ०९/११/२०२३ पर्यंतची शिल्लक | शेरा (मुळ तरतूद + पुनर्विनियोजनाने घेतलेली तरतूद सह रक्कम) |
|---|---|---|---|---|---|
| १ | नाले गटार मो-या बांधणे | रु. ५०९.९० लक्ष | रु.५०९.९० लक्ष | ०.०० लक्ष | (५००.००+९.९० = ५०९.९० लक्ष) |
| | एकूण | रु. ५०९.९० लक्ष | रु.५०९.९० लक्ष | ०.०० लक्ष | |

सन २०२३-२०२४ या वित्तीय वर्षाचा जो अर्थसंकल्प मंजूर झाला आहे, त्यामधील नाले गटार मो-या बांधणे या लेखाशिर्षामधील निधी संपलेला आहे. मात्र खालील विषयांकित काम हे संस्थेने विहीत मुदतीत पुर्ण केलेले असून कामाचे अंदाजपत्रकीय मुल्य रु. ८,९२,४९९/- लक्ष चे आहे. देयक अदा करणेकामी नाले गटार मो-या बांधणे या लेखाशिर्षामध्ये निधी शिल्लक नसल्यामुळे इतर लेखाशिर्षकामधून पुनर्विनियोजन करुन निधी उपलब्ध करुन देयक अदा करावे लागणार आहे. तरी खालील कामाकरीता वरील लेखाशिर्षामध्ये "नविन कर्मचारी निवासस्थान बांधणे " या लेखाशिर्षामधुन रु. ८.९३ लक्ष रुपयाचे पुनर्विनियोजन करावयाचे आहे.

| कामाचे नाव | रक्कम | शेरा |
|---|---|---|
| वार्ड क्र.१६ शास्त्रीनगर मधील मंतेश वडगाव यांचे घरापासून ते मनपा शौचालय पर्यत नविन गटर बनविणे. | रु. ८,९२,४९९/- | |
| एकूण | रु. ८,९२,४९९/- | |

खालील लेखाशिर्षामधून पुनर्विनियोजन करावयाचे आहे.

| अ. क्र. | लेखाशिर्षाचे नाव | सन २०२३-२४ करीता करणेत आलेली तरतूद | दि. ०९/११/२०२३ पर्यत नोंदविलेली तरतूद रक्कम पुनर्विनियोजनाच्या रक्कमेसह (खर्च) | दि. ०९/११/२०२३ पर्यंतची तरतूद शिल्लक रक्कम | पुनर्विनियोजना करीता घ्यावयाची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | नविन कर्मचारी निवासस्थान बांधणे | रु.३००.०० लक्ष | रु.१६९.९० लक्ष | रु.१३०.१० लक्ष | रु.८.९३ लक्ष |
| | एकूण | रु.३००.०० लक्ष | रु.१६९.९० लक्ष | रु.१३०.१० लक्ष | रु.८.९३ लक्ष |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १०२,कलम १०३ व कलम १०४ अन्वये एखादया लेखाशिर्षाखाली रक्कम खर्च झाली नाही व त्यात बचत झाली तर या नियमाच्या आधारे अनुदानाच्या तुलनेत जादा होणारा खर्च बचतीच्या रक्कमांचा उपयोग करून भागवीता येवू शकतो व असे पुर्नविनियोजन करण्याचे अधिकार मा.आयुक्त सो यांचे मान्यतेने मा.स्थायी समितीस सादर करणे आवश्यक आहे. मात्र सध्या स्थायी समितीचे अधिकार मा.प्रशासक तथा आयुक्त सा.ो. यांच्याकडे निहीत आहेत.

वार्ड क्र.१६ शास्त्रीनगर मधील मंतेश वडगाव यांचे घरापासून ते मनपा शौचालय पर्यत नविन गटर बनविणे. विषयांकित कामाकरीता निधीचे पुर्नविनियोजन करणेकामी कनिष्ठ अभियंता यांनी मुळ संचिकेसह प्रस्ताव सादर केलेला आहे. त्या अनुषंगाने नाले गटार मो-या बांधणे या लेखाशिर्षामध्ये "नविन कर्मचारी निवासस्थान बांधणे " या लेखाशिर्षामधून रु.८.९३ लक्ष रुपयाचे पुर्नविनियोजन करणे आवश्यक असून त्याचा स्वतंत्र नमूना क्र.१० नियम ३० (३) प्रस्ताव तयार केला आहे. त्यास मा.प्रशासक तथा आयुक्त सा.ो. यांनी दिनांक २३ /११/२०२३ रोजी मान्यता दिलेली आहे. तरी यासाठीचा प्रशासकीय ठराव मंजुर करुन घ्यावा ही विनंती.

ठराव क्र. २९४ दिनांक २४/११/२०२३

वार्ड क्र.१६ शास्त्रीनगर मधील मंतेश वडगाव यांचे घरापासून ते मनपा शौचालय पर्यत नविन गटर बनविणे. विषयांकित काम विहीत मुदतीत पुर्ण झालेले असून ठेकेदार यांचे देयक अदा करणेकामी नाले गटार मो-या बांधणे या लेखाशिर्षामध्ये तरतुद (निधी) शिल्लक नसल्यामूळे "नविन कर्मचारी निवासस्थान बांधणे" या लेखाशिर्षामधून एकूण रु. ८.९३ लक्ष रुपयाचे नाले गटार मो-या बांधणे या लेखाशिर्षामध्ये पुर्नवियिोजनाने निधी वर्ग करणेस महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४ दि.६ जुन २०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी श्री.अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त उपरोक्त शिफारस केल्याप्रमाणे मान्यता देत आहे.

(अजय वैद्य)
प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

नमुना क्र.१०

नियम ३० (३) पहा

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी

| या लेखाशिर्षातुन | | | | | | या लेखाशिर्षाकरिता | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | प्रधान,गौण व तपशिलवार माहिती | बांधकाम विषयक सेवा व इतर | मुळ अनुदान पर्यत खर्च | आज तारखे पर्यत खर्च | उपलब्ध शिल्लक | प्रधान,गौण व तपशिलवार माहिती | बांधकाम विषयक सेवा व इतर | मुळ अनुदान पर्यत खर्च | आज तारखे पर्यत खर्च | प्रस्तावित वाढीची रक्कम खर्च | अभिप्राय |
| १ | भांडवली खर्च भाग-४ | अ-२/३ नविन कर्मचारी निवासस्थान बांधणे | सन २०२३-२४ करीता रु.३००.०० लक्ष | सन २०२३-२४ करीता रु.१६९.९० लक्ष | सन २०२३-२४ करीता रु.१३०.१० लक्ष | भांडवली खर्च भाग-४ | नाले गटार मो-या बांधणे | सन २०२३-२४ करीता रु.५०९.९० लक्ष | सन २०२३-२४ करीता रु.५०९.९० लक्ष | रु.८.९३ लक्ष | प्रभाग समिती क्र.३ अंतर्गत नविन गटार बनविणेकामी नविन कर्मचारी निवासस्थान बांधणे या लेखा मधून नाले गटार मो-या बांधणे या लेखा मध्ये रु.८.९३ लक्ष रुपये पुर्नविनियोजनाने प्रस्तावित करण्यात येत आहेत. |

शहर अभियंता
भिवंडी नि.शहर मनपा

मुख्य लेखा परिक्षक
भिवंडी नि.शहर मनपा

मुख्य लेखा व वित्त अधिकारी
भिवंडी नि.शहर मनपा

अति. आयुक्त
भिवंडी नि.शहर मनपा

प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी नि.शहर मनपा